म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा-वा.
दा. क्र. ८२६८

आमच्या

# छान छान गोष्टी

[ गट १ ला ]



IRBK-0109279

बाल वाङ्मय निर्मिती शिबीर, भोर

बालवाङ्मय निर्मिति शिबीर

# आमच्या छान छान गोष्टी

SEP 1972

23 JUN

★

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
वा. क्र. ९२७९ ... ता. दि ...............
वि. ............... क्र. ...............

IRBK-0109279

किंमत ५८ नवे पैसे

: प्रकाशक :

**सौ. शांताबाई भांडारकर**

संचालिका, बालवाङ्मय निर्मिति शिबीर

डेक्कन कॉलेज, पुणे.

●●●

: मुद्रक :

**मा. र. कारले**

जनसेवा मुद्रणालय,

१९२ शुक्रवार, पुणे २.

१२५९

अनुक्रम २९५४२
विभाग बा.वा.
क्रमांक २९२२
नों. दि. ३१-७-५१

# निवेदन

बालवाङ्मय निर्मितीचें शास्त्रशुद्ध शिक्षण घेण्यासाठीं भोर येथील शिबिरांत मराठी भाषिक विभागांतून वीस लेखक आले होते. त्या लेखकांनीं लिहिलेल्या वाङ्मयांपैकीं कांहीं वाङ्मय पुस्तक रूपानें छापलें जात आहे.

हीं पुस्तकें लिहितांना वाचकांच्या वयोमर्यादेचा, आवडी-निवडीचा व मनोविकासाचा विशेष विचार केला आहे. पुस्तकांचीं हस्तलिखितें तयार झाल्या-नंतर तीं केवळ शिबिरास आलेल्या लेखकांनींच वाचलीं व दुरुस्त केलीं असें नव्हे, तर ज्या वयाच्या मुलांसाठीं तीं लिहिलीं गेलीं त्या वयाच्या मुलांनाहि तीं वाचून दाखविलीं व त्यांची प्रतिक्रिया अजमावून मूळ लिखाणांत योग्य त्या दुरुस्त्या केल्या. या कसोट्या लावल्यामुळें हीं पुस्तकें जास्तींत जास्त निर्दोष करण्याचा प्रयत्न केला आहे ही गोष्ट सहजच नजरेस येईल.

भारत सरकारच्या शिक्षण-खात्यानें पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं रक्कम जी मान्य केली होती, त्यांतून सहा पुस्तकांचा हा पहिला संच प्रसिद्ध केला जात आहे. यथावकाश दुसरा संचहि प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

या पुस्तकांच्या प्रकाशनामुळें लेखक व प्रकाशक यांचें लक्ष बालकांच्या गरजा व आवडी-निवडी यांकडे अधिक प्रमाणांत लागेल व बालवाङ्मय-निर्मितीच्या क्षेत्रांत नवें दालन उघडलें जाईल असा विश्वास वाटतो.

शांता भांडारकर
संचालिका
बालवाङ्मय निर्मिति शिबीर

## अनुक्रम –


| | | |
|---|---|---|
| १. सशाची ओवाळणी | – तारा वैशंपायन | – पान पाच |
| २. कोल्ह्याची फजिती | ,, ,, | – पान दहा |
| ३. हिरवा वाघोबा | – सुरेश राऊत | – पान पंधरा |
| ४. फुगेच फुगे | – भालचंद्र रानडे | – पान अठरा |
| ५. खाऊची बाग | – दिनकर नीलकंठ [illegible] | – पान बावीस |
| ६. प्राण्यांची विहीर | ,, ,, | – पान सत्तावीस |
| ७. उपकाराची फेड | .... .... | – पान तीस |


★ ★ ★

बा.वा
2922
३।७

# सशाची ओवाळणी

एक होता ससा. पांढरा पांढरा छान.
उंच उंच कान. गुबगुबीत मान.
धुंदीत होता रान.

त्याला जायचं होतं बहिणीकडे. कशाला? भाऊबिजेला. बहिणीचं घर खूप खूप लांब होतं. त्या सशाचं नांव होतं टिल्लू. बहिणीचं नांव होतं पिल्लू. टिल्लूदादा चालला पिल्लूताईकडे.

वाटेंत खूप खूप उंच गवत वाढलं होतं. वाट शोधीत तो गवतांतून चालला. टिल्लूदादानं डोकं खाजवलं. मी ताईकडे चाललों. पण ओवाळणी काय घेऊं ? त्यानं वर पाहिलं. त्याला फळांनीं भरलेलं झाड दिसलं. अबब! किती फळं!! टिल्लू लागला झाडावर चढायला. पण चढतांच येईना. त्यानं झाडाखालीं पाहिलं. त्याला एक फळ सापडलं.

'गोल गोल चेंडू सारखं. टणक टणक नारळासारखं.'


टिल्लूदादानं तें नीट पाहिलं. तो एकदम ओरडला. 'कवठ रे कवठ !' पलिकडे होता कोल्हा. त्यानं तें ऐकलं. त्याला वाटलं, कोंबडीचं कवट ! तो लपत छपत आला. कशाला ? कोंबडीचं कवट पळवायला. त्याला

कोंबडीचं कवट दिसलं नाहीं. त्याला दिसला ससा. कसा छान गुबगुबीत ! त्याच्या तोंडाला पाणी सुटलं.

मग कोल्हा सशाजवळ गेला. सशाला म्हणाला,

" ससेभाऊ, ससेभाऊ, कुठें चाललांत ?"

टिल्लूनं दचकून पाहिलं. त्याला दिसला कोल्हा. टिल्लू खूप घाबरला. थरथर कांपूं लागला, त्यानं कोल्ह्याकडे पाहिलं. आतां कोल्हा टिल्लूला पकडणार.



इतक्यांत काय झालं ? वारा आला. झाड हाललं.

एक कवठ खालीं पडलं. कुठें ? कोल्ह्याच्या नाकावर. कोल्हा घाबरला. कुई कई करीत धूम पळत सुटला.

टिल्लूला खूप आनंद झाला. त्याला वाटलं; आतां कोल्हा येणार नाहीं. छान खोड मोडली त्याची ! मग टिल्लूनं कवठ घेतलं. जमिनीवरून ढकलत ढकलत बहिणी-कडे निघाला. टिल्लूची बहीण वाटच पाहात होती. ती म्हणाली, ' दादा, किती रे उशीर केलास ? ' तिचं बोलणं तिच्या पिलांनीं ऐकलं. तीं बाहेर आलीं. मामाला पाहून त्यांना खूप आनंद झाला. 'आमचा मामा आला' असें म्हणत टुणटुण उड्या मारूं लागलीं.

पिल्लूताईचं घर फार सुंदर होतं. तें एका छोट्या जाळींत होतं. बाजूला खूप फुलं होतीं. पानं होतीं. वेली होत्या. झाडं झुडपं होतीं. छोटासा ओढापण होता.

पिल्लूनं दादाला घरांत नेलं. पाटावर बसवलं. फुलांचं अत्तर अंगाला लावलं. गरम पाण्यानं आंघोळ घातली. टिल्लूला खूप बरं वाटलं. तो आपल्या भाच्यांशीं गप्पा मारीत बसला.

इकडे ताईनं काय केलं ? रंगीत फुलांची रांगोळी घातली. रंगीत फुलांचा पाट केला. गोलगोल पानांचं ताट मांडलं. पानावर कोवळीं कणसं व फळं वाढलीं. मग दादाला म्हणाली, ' चल रे दादा; मी तुला

ओवाळतें.' टिल्लू पाटावर बसला. दादाला ओवाळलं. टिल्लूनं तिला ओवाळणी घातली. काय बरं ? कवठ !

अबब ! किती जड. तिनं पान खालीं ठेवलं. टणक टणक आणि गोल गोल. ती टिल्लूजवळ गेली. टिल्लूला म्हणाली; ' दादा,असली रे कसली ओवाळणी ' ?

टिल्लू म्हणाला, 'भावानं घातलेली ओवाळणी आहे ही. टाकूं नको. गोड मानून घे.' तिनं भावाचं ऐकलं.


कवठ घेतलं. बिळांत नीट ठेवून दिलं.

साऱ्यांचीं जेवणं झालीं. पिलें झोपलीं नाहींत. मामाजवळ गोष्ट ऐकत बसलीं.

इतक्यांत काय झालं ? सुकलेल्या पानांतून सळ-सळ आवाज आला. टिल्लू उठला. त्यानं आपले कान टवकारले. पिल्लूताई उठली. पिलें उठलीं. साऱ्यांनीं आपले कान टवकारले. आवाज जवळ येऊं लागला. तीं सारीं घाबरलीं. टिल्लूनं इकडे तिकडे पाहिलं. त्याला बिळांत ठेवलेलं कवठ दिसलं. त्यानं तें घेतलं. हळूच बाहेर आला. त्यानं मान उंच करून पाहिलं. दुपारीं पाहिलेला कोल्हा जवळ येत होता. टिल्लूनं कवठ उचललं. जोरानं कोल्ह्यावर फेकलं. कवठ कोल्ह्याच्या नाकावर लागलं. भळभळ रक्त येऊं लागलं.

कोल्हा ओरडूं लागला. कुई कुई कुई ! पिलं बाहेर आलीं. त्यांनीं पाहिलं. कोल्हा धूम पळत सुटला होता. त्याला पळतांना पाहून साऱ्यांना आनंद झाला. खूप गंमत वाटली. पिलं नाचूं लागलीं. गाऊं लागलीं.

मामा आमचा छोटा ।
हुशार आहे मोठा ।
कोल्हा आला छपून ।
नेम मारला जपून ।



# कोल्ह्याची फजिती

एक होतं माकड. एक होता ससा. आणि एक होता पोपट. तिघांची मैत्री जमली.

एकदां तिघांनीं ठरवलं. खूप लांब जायचं. जंगलांत ! पोपट चालला हवेंत उडत. माकड चाललं झाडावरून उड्या मारीत. ससा चालला जमिनीवरून टुणटुणत. खूप दूर गेले. मोठ्या जंगलांत. त्या जंगलांत होतीं झाडंच झाडं ! बोर, जांभूळ, आंबा, चिंच. ती जागा त्यांना फार आवडली.

माकड चढलं झाडावर. पोपट गेला झाडावर त्यांनीं खूप फळें काढलीं. तिघांनीं पोटभर खाल्लीं. मग त्यांना लागली तहान. ते लागले पाणी शोधायला. शोधतां शोधतां त्यांना एक खूप मोठं तळं दिसलं. ते तळ्याजवळ गेले. कांठावर जाऊन पाणी प्याले.

इतक्यांत एक पान भिरभिरत आलं. तळ्यांत पडलं. पोहूं लागलं. त्याला पोहतांना पाहून सशाला खूप गंमत वाटली. त्यानं एक काटकी घेतली. पाण्यांत टाकली. काटकी पाण्यांत पोहूं लागली.

माकडानं एक लाकूड आणलं. पाण्यांत टाकलं. लाकूड पोहूं लागलं. मग दगड पाण्यांत टाकला. दगड

2922
3/7/67




गेला बुडून. मग त्यांना समजलं. दगड बुडतो. लाकूड कांहीं बुडत नाहीं.

पोपटानं शीळ घालीत म्हटलं. आपल्याला पाण्यांत राहतां आलं असतं तर किती मजा उडाली असती ! पण पाण्यांत कसं जायचं ? त्यांना भीति वाटत होती. इतक्यांत काय झालं ? माकडाला युक्ति सुचली. तें म्हणालं, आपण लाकूड व पानं यांचं घर बांधूं. ही युक्ति सर्वांना आवडली. ससा उड्या मारूं लागला. पोपट शीळ घालूं लागला.

तिघांनीं सामान आणलं. पोपटानं पानं आणलीं. सशानं काटक्या आणल्या. माकडानं मोठीं लाकडं आणलीं. जमिनीवर छानसं घर तयार केलं. पानांचीं कौलं फारच छान दिसत होतीं.

तिघांनीं घर पाण्यांत सोडलं. घर पाण्यांत पोहूं लागलं. त्यांना खूप गंमत वाटली. ते नाचूं लागले. पोपटानं शीळ घातली. भुर्रदिशी घरांत जाऊन बसला. शीळ घालीतच तो म्हणाला, ‘ माकडदादा, येना घरांत; ससेभाऊ, येना घरांत !’ पण घर गेलं होतं तळ्याच्या मध्यावर. ससेभाऊ व माकडदादा विचार करूं लागले. कसं जायचं घरांत ? पोहतां कुठं येतंय ? उडतां कुठं येतंय ? त्यांना खूप वाईट वाटलं. इतक्यांत त्यांना एक

लाकूड दिसलं. जाड जाड होतं तें. त्याला टाकलं पाण्यांत. लाकूड पोहूं लागलं. त्यावर बसून ते दोघे चालले डुबुक् डुबुक् करीत. त्यांना वाटली मजा. डुबुक् डुबुक् करीत घरांत गेले. मजेनें राहूं लागले.



एकदां काय झालं ? माकड आणि पोपट फळें आणायला निघाले. जातांना माकड म्हणालं; 'ससेभाऊ, तूं लहान आहेस. तूं दमशील. तूं घरांत बैस. कोणीं आलं तर दार उघडूं नको. कोणी कांहीं सांगितलं तर ऐकूं नको. आम्हीं दुपारीं परत येऊं. सशानं मान डोलावली. तो घरांत गेला. त्यानं दार लावून घेतलं.

तिकडून जात होता कोल्हा. कोल्ह्यानं तें पाहिलं. त्याला खूप आनंद झाला. त्याला वाटलं; किती गुबगुबीत ससा आहे ! खायला मिळाला तर खूप मजा येईल.

माकड व पोपट निघून गेल्यावर कोल्हा लाकडाच्या ओंडक्यावर बसला. घराजवळ गेला. गोड आवाजानं गाऊं लागला.

'ससेभाऊ ससेभाऊ। अंग किती मऊ मऊ।
डोळे किती लाल लाल। टुणुक टुणुक आहे चाल।
ऐट किती कानांची। पात जशी केवड्याची'।

सशानं हळूच दार उघडलं. बाहेर होता कोल्हा. त्यानं सशाला पटकन पकडलं. ससा ओरडूं लागला. पोपटानं ऐकलं. माकडानं ऐकलं. ते दोघे पळत आले. माकडानं कोल्ह्याच्या तोंडांत मारलं. पोपटानं चोंचीनं टोचलं. सशाला सोडून कोल्हा धूम पळत सुटला.


दुसऱ्या दिवशीं माकड व पोपट फळें आणायला निघाले. जातांना माकडानं सशाला हळूच कांहींतरी सांगितलं. सशानं मान डोलावली. ते दूर निघून गेले. कोल्ह्यानं त्यांना पाहिलं. पुन्हा तो सशाकडे आला.

'ससेभाऊ ससेभाऊ। अंग किती मऊ मऊ'

हें गाणं म्हणूं लागला. पण ससा बाहेर आला नाहीं.

त्यानं फटींतून पाहिलं. कालचाच कोल्हा होता. त्याला भीति वाटली. पण त्याला लगेच माकडानं सांगितलेली युक्ति सुचली.

सशानं कोल्ह्याला सांगितलं. माकडानं दार बंद केलं आहे. मला उघडतां येत नाहीं. 'तूं मोठा दगड आण. दार फोड. मग मी बाहेर येतों.' कोल्हा 'बरं' म्हणाला. बाहेर गेला. मोठा दगड आणला. दगड घेऊन ओंडक्यावर बसूं लागला. पण त्याला दोन पायांवर बसतांच



येईना.' त्याचा तोल गेला. तो पाण्यांत पडला. धुप्दिशीं आवाज झाला. सशानं दाराच्या फटींतून पाहिलं. त्याला खूप गंमत वाटली. तो म्हणाला,

'कोल्हेदादा, कोल्हेदादा, फसवतां कां दुसऱ्याला ?
म्हणून केली देवानं, शिक्षा आज तुम्हांला !'

# हिरवा वाघोबा

शिरीष आणि अशोक. दोघेहि मित्र होते. दोघेहि खोडकर होते. खूप मस्ती करायचे. खोड्या करायचे.

एकदां शिरीष आला शाळेंतून. अशोक आला शाळेंतून. गुरुजींनीं शिरीषला गोष्ट सांगितली होती. ती गोष्ट वाघाची होती. शिरीषनें ती गोष्ट अशोकला सांगितली. वाघाला मोठ्या मोठ्या मिशा असतात. वाघाला पाहून सगळेजण घाबरतात.

शिरीष म्हणाला, 'आपल्याला वाघोबा मिळाला तर ? काय गंमत येईल नाहीं ? सगळेजण त्याला घाबरतील.'

अशोक म्हणाला, 'आपली मनीमावशी आहे ना ? तिला आहेत मोठ्या मोठ्या मिशा. तिलाच आपण वाघ बनवूं या.'

शिरीष आणि अशोक दोघेहि घरीं गेले. शिरीषनें दादांची हिरवी शाई आणली. अशोकनें बाबांचा दाढीचा ब्रश आणला.

अशोकनें वाटींतून दूध आणलें. दूध बघून मनीला आनंद झाला. जीभ काढीत ती वाटीजवळ आली लप लप करून दूध पिऊं लागली.

अशोक पुढें झाला. त्यानें मनीचा पाय धरला. शिरीष पुढें झाला. त्यानें मनीचा दुसरा पाय धरला.

शिरीषजवळ हिरव्या शाईची दऊत होती. अशोकनें शाईंत ब्रश बुडवला. ब्रशानें मनीच्या अंगावर हिरवा पट्टा रंगवला.

मनीच्या अंगावर थंडगार शाई लागली. मनीला खूप थंडी वाजली. मनी मोठ्यानें ओरडली 'म्याव म्याव'. तिनें पंजांतील नखें बाहेर काढलीं. अशोक आणि शिरीषच्या हातावर ओरखडलें. शिरीष घाबरला. त्याच्या हातांतून हिरवी दऊत पडली. मनी हिरवी झाली.

मनीला वाटलें कीं तिच्या अंगावर पाणी पडलें. तिनें जोरानें अंग झटकले. मनीच्या अंगावरची हिरवी शाई उडाली. दोघांच्या कपड्यावर हिरवे हिरवे ठिपके उडाले. दोघांचे हात दुखूं लागले. दोघेहि ओरडूं लागले. " आई ग ! "

अशोकचा आवाज बाबांनीं ऐकला. ते बाहेर आले. अशोकनें दाढीचा ब्रश खराब केला. म्हणून बाबांनीं अशोकला धपाटा घातला. शिरीषचा आवाज दादांनीं ऐकला. ते बाहेर आले. शिरीषनें शाईची दऊत सांडली म्हणून दादांनीं शिरीषला धपाटा घातला.



त्यांनीं दोघांनाहि धपाटे घातले. मनीनें तें पाहिलें.
हिरवी हिरवी झालेली मनी पळून गेली.

# फुगेच फुगे

फुगेवाला आला. दाराशीं उभा राहिला. त्यानें पिपाणी काढली. पों ऽऽ! पों पों ऽऽ!

पिपाणीचा आवाज ऐकला. फुग्याचा आवाज ऐकला. सारीं मुलें गोळा झालीं.

“ अहो, फुगेवाले! मला तो तांबला फुगा द्या ” छोट्या ऐटींत म्हणाला.

“ अहो, फुगेवाले ! मला किनयी तो तो वलचा हिलवा फुगा द्या हं ! ” भारती नाचत नाचत म्हणाली.

कोणी हिरवा, कोणी पिवळा, कोणी तांबडा, कोणी जांभळा. कोणी कसा, कोणी कसा फुगा घेतला. सारीं मुलें आनंदानें नाचूं लागलीं.

छोटा मनोहर आपल्या भावाकडे गेला आणि म्हणाला, “ए भाऊ, मला छोटूसारखा तांबला फुदा हवा. दे नाले घेऊन ! ”

“थांब हं! आपली आई स्वयंपाक करायला गेली आहे. ती आली कीं नाही, म्हणजे आपण घेऊं फुगे. तुला एक नि मला एक ! ” भाऊनें त्याची समजूत घाल-ण्याचा प्रयत्न करीत म्हटलें.

" छोट्यानें तांबला घेतला, मालतीनें हिलवा घेतला. मला तांबला फुदा हवा !" मनोहरनें अधिक केविलवाण्या स्वरानें आपली मागणी भावाजवळ मांडली.

पों ऽऽ! पों ऽऽ! पों ऽऽ! असा पिपाणीचा व किर ऽऽ किर ऽऽ किर ऽऽ असा फुग्याचा आवाज मनोहरच्या कानावर पडला.

मनोहरनें फुग्यासाठीं अधिकच हट्ट घेतला. तो दोन्ही पाय आपटून—" मला फुदा हवा ! मला तांबला फुदा हवा !" असें म्हणून जोरजोरानें रडूं लागला.

" तुझा फुगा दे जरा वेळ आमच्या मनोहरला—" भाऊनें छोटूला विचारलें.

" मी नाहीं देनाल जा ! हा मादा आहे. माझ्या आईनें दिला आहे मला. " छोट्या म्हणाला.

आपल्याला फुगा मिळत नाहीं. हें पाहून मनोहरनें अधिकच मोठा सूर काढला. त्याचें रडणें कसें थांबवावें ? हा प्रश्न भाऊला पडला. त्याला कांहीं सुचेना. भाऊच्याही डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या.

"मनू, आज आपले बाबा असते तर आपल्याला आतां नक्की नक्की फुगा मिळाला असता. आईला स्वयंपाक करायला लागला नसता." भाऊनें मनोहरची समजूत घालण्याचा आणखी प्रयत्न केला.

"भाऊ, आपल्या बा...बा...ना देवांनीं काले नेलें?" मनोहर हुंदके देत देत भाऊला म्हणाला.


थोडा वेळ गेला. भाऊला एक युक्ति सुचली.

"मनू, तुला फुगा हवा आहे ना? अरे एकच काय, तुला मी शंभर फुगे देतों शंभर!" भाऊनें मनूला सांगितलें.

आतांपर्यंत एकही फुगा मिळत नव्हता. आतां आपल्याला खूप खूप फुगे मिळणार असें पाहून मनोहरचें रडणें एकदम थांबलें.

भाऊ झटकन् घरांत गेला. त्यानें एक वाटी घेतली. तींत एक साबणाचा तुकडा टाकला. वाटींत थोडें पाणी घातलें. साबणाचा फेस तयार केला. एक पोकळ नळी घेतली. ती त्या फेसांत बुडविली. नळी तोंडांत धरली. हळूं हळूं फुंकूं लागला.

थोड्याच वेळांत असंख्य फुगे हवेंत नाचूं लागले. कांहीं मोठे, कांहीं लहान. तांबडे, जांभळे, निळे, पांढरे मनोहरनें फुगे पाहिले. तो आनंदानें नाचूं लागला. त्यानें छोटूला बोलाविलें. प्रमोदला बोलाविलें. भारतीला बोलाविलें. वाड्यांतील सारीं मुलें गोळा झालीं.



उडणाऱ्या फुग्यांकडे मनू सारखा बघत होता. वर जाणाऱ्या फुग्यांकडे पाहून त्यानें फुग्यांबरोबर आपल्या बाबांना निरोप धाडला.

“ अहो! फुग्यानों वलती जा ।
देवाच्या घलीं लवकर जा ॥
थांगा आमुच्या बाबांना ।
मनुच्या घलिं तुम्ही येतां ना ? ॥ ”

# खाऊची बाग

बेबी लहान होती. तिला फिरण्याचा भारी नाद. आज तिनें ठरविलं होतं, खाऊच्या बागेंत जायचं. नंदूनें तिला या बागेची माहिती दिली होती. चकली, लाडू, पेढे कितीतरी खाऊच्या झाडांचीं नांवें सांगितलीं होतीं. आई केव्हां झोपते, बाबा केव्हां झोपतात, याची वाट



पाहात ती खाटेवर बसली. बसून बसून कंटाळा आला तशी ती अंथरुणावर पडली.

सोनी बाहुली तिच्या खाटेवरच होती. तिला जवळ घेत बेबी म्हणाली—

" बरं का सोनुताई, आज आपणांस खाऊच्या बागेंत जायचं आहे. झोपूं नको हं !....

सोनी खुदकन् हंसली आणि म्हणाली—

" बेबी तूं झोप थोडी. सारीकडे शान्त झालं कीं तुला उठवितें ! "

सारं सामसूम झालं. आई झोपली. बाबा झोपले. चिमी झोपली. अन् बेबीहि झोपली. तितक्यांत कुणीतरी तिच्या कानापाशीं गुणगुणलं ....

" बेबी ! बेबी !! वा ग वा, झोपली कशी ? चल आपणांस खाऊच्या बागेंत जायचं आहे ना ? "

बेबी जागी झाली. तिनं पाहिलं. सोनी तिला उठवित होती. चटदिशी ती उठली. घरांत गेली. मोठी पिशवी घेतली. दाराची कडी काढली. कुणाला जाग आली नाहीं. दोघीहि घराबाहेर निघाल्या.

बरेंच दूर गेल्यावर त्यांना एक बाग लागली. बागेला हलव्याच्या काट्यांचं कुंपण होतं. साखरेचा मोठा दरवाजा होता. त्यावर पेपरमिंटाची वेल होती. हिरव्या, पिवळ्या, लाल कितीतरी रंगाच्या वड्या त्यावर लटकत होत्या.

बाग पाहून बेबीला आनंद झाला. ती टाळ्या वाजवूं लागली. तसा तिचा हात धरून सोनी म्हणाली—

" बेबीताई टाळ्या नको वाजवूं. नाहींतर बागेचा रखवालदार जागा होईल. तो पहा ! ती बिस्किटाची झोपडी आहे ना ? त्यासमोरच झोपला आहे तो. "

बेबीनं टांचा उंचावून पाहिलं. रखवालदार गारेगार झोपला होता. पायाचा आवाज न होऊं देतां दोघी आंत आल्या. रखवालदार चांगलाच आडदांड होता. उशाखालीं त्यानं झेंडूचीं मोठीं फुलं घेतलीं होतीं. अंगांत बदामाच्या सालीचा पातळ अंगरखा, डोकीला चकलीचा फेटा, पायांत खारकांच्या बियांचा जोडा, असा त्याचा पोशाक होता. बाजूलाच लाडू लावलेली काठी पडली होती.

दोघीहि बिस्किटाच्या झोपडीमागें आल्या. तिथून बाग फार सुंदर दिसत होती. कांहीं झाडांवर पिवळ्या पिवळ्या जिलब्या लटकत होत्या. त्याचा पाक जमिनीवर टिपकत होता. करंज्यांचीं लहान लहान झाडं रांगेनें उभीं होतीं. कांहींवरील करंज्या कच्च्याच होत्या. शेवेच्या दोन नाजुक वेली पसरल्या होत्या. चिवड्याच्या झाडाला बहार आला होता. त्याचा खमंग वास तोंडाला पाणी आणीत होता. सरबताचें कारंजें थुईथुई उडत होतें.

श्रीखंडाची विहीर काठोकाठ भरली होती. उसाचा रस सारीकडे वहात होता. बासुंदीचं टाकं मात्र कोरडं ठण-ठणीत होतं. कडबोळ्याचीं कोवळीं रोपं उगवलीं होतीं. मोठा मजेदार वास सुटला होता. त्यामुळें बेबीच्या तोंडाला तर खूप खूप पाणी आलं.

बेबी हळकेच जिलबीच्या झाडाकडे सरकली. अंगठ्याएवढीं चार-सहा पोरं तिथें पडलेला पाक खाण्यांत दंग होती. पण त्या चिमुरड्यांना तिची चाहूल लागली....

" राक्षसीण आली राक्षसीण ! " पोरं ओरडलीं.

आपल्या सारख्या सुंदर मुलीला राक्षसीण म्हणावं ह्याचा बेबीला राग आला. ती पोरांकडे धांवली. त्यांतील एकानें एक पेढा तोडला. बेबीला फेकून मारला. पण तो नेमका लागला रखवालदाराला. तो खडबडून जागा झाला. तो जोरानें ओरडला—

" कोण शिरलं रे माझ्या बागेंत ! बोलतो कीं सोडूं चावरं कुत्रं ! "

बेबी-सोनी घाबरल्या. वाट मिळेल तिकडे पळूं लागल्या. टारगट पोरं पसार झालीं. रखवालदार बेबीच्या मागें धावूं लागला. झिपरा कुत्राहि धांवत होता. भोंऽ भोंऽ भोंऽ भुंकत होता.

धावून धावून बेबी दमली. सोनी थकली. रखवालदार फारच चिडला. त्यानं हातांतील काठी फेकून मारली. ती बेबीच्या पायाला लागली. आई गऽऽ म्हणून बेबी खालीं बसली. सोनी तिला सोडून दूरदूर पळून गेली.

" काय ग काय झालं तुला !" बेबीच्या काना-जवळ कुणीतरी बोललं. बेबीनं भीत भीतच डोळे उघडले. आई तिला उठवीत होती. रखवालदार, खाऊची बाग, चावरं कुत्रं, सारं सारं स्वप्नच होतं तर....बेबी स्वतःशींच बडबडली. शेजारीं पडलेली बाहुली तिच्याकडे पाहून खुदकन् हंसली नि म्हणाली—

" कशी फजिती झाली एका पोरीची ! "


संकटांत टाकून पळून जाणाऱ्या सोनीचा बेबीला देखील राग आला. तिनं रागानं सोनीला अंथरुणांत गुंडाळून टाकलं आणि म्हणाली—

" अशीच शिक्षा हवी तुला ! "

❀ ❀ ❀

# प्राण्यांची विहीर

ऑंव ऽ ऑंव ऽऽ सिंहानें जोरानें डरकाळी फोडली. सारें रान दणाणून गेलें.



कोल्होबाला आवाज आला. तो घरचें काम सोडून निघाला. वाटेंत भेटणाऱ्यांना सांगूं लागला—

" चला, चला, सिंहराज बोलावताहेत! कांहीं-तरी संकट आलं आहे···धावा, धावा "!

सिंहराज एका थोरल्या ओट्यावर बसले होते. आलेल्या प्राण्यांकडे पहात होते. जो तो विचारीत होता. कसली हो सभा? काय झालं? कुणी गुन्हा केला?

सिंहराजानें घसा साफ केला. सर्व कान देऊन ऐकूं लागले—

"प्रिय प्राण्यांनों ! आज इथें येण्याचें कारण··· आपणांस पाण्याची सोय करायची आहे. आतां उन्हाळा येणार. पाण्याचं कसं ? कुठें जायचं पाण्याकरितां ? मागें पाणी पाणी करीत किती छकुलीं मेलीं ! यंदा तसं नको व्हायला. सुचतो का कोणाला कांहीं उपाय ?"

इतकें बोलून सिंहराज खालीं बसले. सर्व जण आपसांत बोलूं लागले. गोंगाट वाढला. सर्वांना त्यांची कल्पना आवडली जो तो म्हणाला—

"वा छान कल्पना आहे. हें तर आपल्या लक्षांत आलं नाहीं. खरंच पाणी हवं. व्यवस्था करायला हवी !"

म्हातारा हत्तीदादा सांगूं लागला.

"एक विहीर जवळच आहे. पण बुजली आहे. त्यांत गोटे पडले आहेत. तिला पायऱ्या आहेत. सर्वांना पाणी पितां येईल. पहिलें असेंच होतें. आतां तिकडे कुणाचें लक्ष नाहीं म्हणून ती बुजली."

"वा छान ! तीच आपण दुरुस्त करूं. गोटे काढून टाकूं. सफाई करूं. सर्वांना पाणी पितां येईल !" कोल्होबा गोंडेदार शेपटी हलवित बोलले.

"पण कुठें आहे ती विहीर !" माकडानें विचारलें.

" मला माहीत आहे. आपण जाऊं तिकडे. आधीं कामाची वाटणी करूं. म्हणजे एकदम काम चालू करतां येईल." हत्तीनें सांगितलें.

सिंहानें कामाची वाटणी केली. देखरेखीचें काम सशाकडे दिलें. लहानगं पिटुकलं; त्याला तेंच काम हवं होतें. हत्तीकडे गोटे काढण्याचं काम. घुशीकडे उकरण्याचं. प्रत्येकाला काम मिळालं.

सभा संपली. हत्तीमागें सर्व निघाले. जुनी विहीर तिथें आले. विहीर बुजून गेली होती. कामाला आरंभ झाला. प्रत्येकजण मन लावून काम करी. लहानगी खार पण ती मागें नाहीं राहिली. पक्षीहि कामावर आले. कोकिळा गाणें गाई. वानरदादा नकला करी.

लौकरच विहीर साफ झाली. नवी नवी बांधली असें वाटूं लागलें. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

आतां प्राण्यांना पाण्यासाठीं दुसरीकडे जावें लागत नाहीं. त्यांच्या श्रमाचें चीज झालें. एकीचा उपयोग झाला.

# उपकाराची फेड

एक होतें जंगल. त्यांत होत्या हरणाताई. एकदां हरणाताई चरत होत्या. चरतां चरतां त्यांचा पाय पडला विंचवाच्या नांगीवर.



" अग आई ग SS ! माझ्या नांगीवरचा तेवढा पाय काढलात तर बरं होईल हरणाताई" विंचू म्हणाला.

हरणाताईनें आपला पाय बाजूला केला. लागलें नाहींना तुला फार ! बघूं बघूं तुझी नांगी ?

नांगीकडे पहात विंचू म्हणाला. " नांगी म्हणजे माझें हत्यार. तें मोडलें म्हणजे मग मला कोण भिणार ?

माझी नांगी मोडली नाहीं. हरणाताई, हरणाताई मी तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाहीं."

"इवलासा विंचू काय माझ्या उपयोगी पडणार?" हा SSS! हा SSS!" हरणाताई हंसत निघून गेल्या.

विंचवाला तिचें हंसणें ऐकूं आलें. ताई आपल्याला हंसल्या. त्याला फार फार वाईट वाटलें. त्यानें मनांत ठरवलं, आपण ताईंच्या नक्की नक्की उपयोगीं पडायचं. त्यानें आपल्या नांगीकडे पाहिलं. नांगी ऐटीनें वर केली. आणि तोंडानं गाणं गुणगुणूं लागला.
"नांगी माझी वरति करूनीं। फिरावया मी निघतो रानीं।
सिंह वाघ सुद्धां मजपासुनि। दूर दूर हो रहाती ॥

हरणाताई रोज यायच्या. पोटभर गवत खायच्या. पाणी प्यायच्या. आपल्या घरीं जायच्या. हें एका वाघानें पाहिलें. त्यानें मनांत ठरवलं. हें हरण आपण पकडायचं आणि खायचं. हरणाचं मांस वाघाला फार आवडायचं. त्याच्या जिभेला सुटलं पाणी. त्यानें ठरवलं उद्यां या हरणाचा चट्टा मट्टा करायचा.

दुसरे दिवशीं हरणाताई आल्या आणि हिरवळीवर चरूं लागल्या. उड्या मारूं लागल्या.

वाघोबा ठरल्या वेळीं आले. त्यांनीं पाहिलं हरणाताई चरत आहेत. तो एका जाळींत टपून बसला.

विंचूदादा हरणाताईंच्या जवळपास रोज रोज असायचे. कांहीं नाहीं बोलायचे. ते सहज जाळीच्या बाजूला गेले. पहातात तों काय ? वाघोबांची स्वारी बसली आहे टपून.

वाघ हरणाकडे बघत होता. त्याला वाटलें वाघ आतां हरणाताईंना धरणार ! आतां काय करावं ?

त्याला एकदम एक युक्ति सुचली. वाघोबा आपली शेपटी हलवीत बसले होते. तो हळूच शेपटी-जवळ गेला. आतां वाघ हरणावर उडी मारणार ! इतक्यांत विंचवानें आपल्या नांगीचा तडाखा जोरानें शेपटीला दिला.

वाघानें जोरानें डरकाळी फोडली. हरणाताई दचकल्या व जोरानें दूर पळून गेल्या.



IRBK-0109279